**शपथेवरुन साक्ष**

**<u>सरतपास वादीतर्फे त्यांचे वकील श्री पाटील यांचे मार्फत</u>** :–

१. माझ्या शपथपत्रातील मजकुर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

२. मला दि.२३.१०.२०१३ रोजीचे वाटणी पत्र दाखविल्यास मी ते ओळखू शकतो. आता मला दाखविलेले नि.क्र.३६ वरील वाटणी पत्र तेच आहे. त्यावर माझी सा.क्र.४ म्हणून सही आहे. त्यातील मजकुर माझ्या हस्ताक्षरात लिहीलेला आहे. तो मी नेताई परसराम चौधरी यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता. त्यावर लिहून देणार म्हणून असलेले अंगठ्याचे निशाण नेताई चौधरी यांचे आहे. लिहून घेणार म्हणून असलेली सही ही प्रभावती बारेकर व नंदमाला बारेकर यांची आहे. तो दस्त तहसील कार्यालय येथे जाऊन ॲफीडेवीड करण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>उलट तपास प्रतिवादीतर्फे त्यांचे वकील श्री जुमडे यांचे मार्फत</u>** :–

३. मी पंचायत समिती भिवापूर येथे नोकरीला असताना प्रभावती हिचे वडील शेतीच्या कामा संदर्भात माझ्याकडे येत असल्यामुळे त्यांच्याशी माझी ओळख झाली त्यामुळे मी प्रभावती यांना ओळखतो. प्रभावती नेताई यांचे वडील अंदाजे सन २००८ मध्ये वारले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रभावती यांनी कागद पत्र तयार करायचे आहे असे म्हणून मला बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.३६ च्या वाटणी पत्रामध्ये काय लिहीलेले आहे ते मला माहीत नाही. हे मला आठवत नाही की, गट क्र.५८७ हा नेताई यांचे नावे होता का. हे मला माहीत नाही की, नेताई यांच्या बँकेत रकमा जमा होत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रभावती यांनी मला व त्यांची आई व बहीण यांना वडीलांच्या बँकेतील पैसे काढण्याकरिता प्रतिज्ञा पत्र करायचे आहे म्हणून दि.२३.१०.२०१३ रोजी तहसील कार्यालयात बोलाविले होते. हे मला माहीत नाही की, वादी व नेताई परसराम चौधरी यांच्यामध्ये पूर्वीपासूनच वाद होता. मी दि.२३.१०.२०१३ नंतर दि.२६.१०.२०१३ रोजी तहसील कार्यालय भिवापूर येथे पुन्हा गेलो होतो. मी मार्च २०१३ मध्ये सेवानिवृत्त झालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.३६ वरील वाटणी पत्र मी लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रभावती हिने मला चूकीचे माहिती देऊन वाटणी पत्रावर सह्या घेतल्या. माझे आजही प्रभावतीसोबत

कौटूबिंक संबंध आहे. हे मला माहीत आहे की, नि.क्र.३६ वरील वाटणी पत्र तहसीलदार व उपविभागीय अधिकारी त्यांच्या आदेशान्वये खारीज करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२३.१०.२०१३ रोजी नेताई यांच्या सांगण्याप्रमाणे मी वाटणी पत्र लिहीले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रभावतीच्या सांगण्यावरुन खोटे शपथ पत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.३६ वरील स्टॅम्प पेपर नेताईने आणला नव्हता. मी तो स्टॅम्प आणला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९.१०.२०१३ रोजी मी भिवापूरमध्ये नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, नेताईने वाटणी पत्र नंदमाला यांना वाचून दाखविला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, भूसंपादनाच्या कारवाईकरिता व परसराम चौधरी यांच्या बँकेतील कामाकरिता सांगून नि.क्र.३६ वर सह्या घेण्यात आल्या. वादी ही अंगणवाडी सेविका आहे. प्रभावती ह्या मी काम करीत असलेल्या कार्यालयाच्या आवारामध्ये काम करीत असल्यामुळे माझ्या त्यांच्याशी भेटीगाठी होत होत्या. हे मला माहीत नाही की, नेताई ह्या नंदमालासोबत नागपूर येथे राहत होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रभावतीच्या सांगण्यावरुन वाटणी पत्रावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, नेताई व नंदमाला यांना अंधारात ठेवून वाटणी पत्र तयार करुन त्यांना न सांगता त्यांनी सह्या घेतल्या. हे मला माहीत नाही की, गट क्र.५८७ हा नेताई यांना अगोदरच वाटणीमध्ये मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथ पत्र तयार करुन खोटी साक्ष देत आहे. मी माझे शपथ पत्र तयार केलेले आहे. ते मी उमरेड येथे संगणकावर तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वकील साहेबांनी तयार करुन आणलेल्या शपथ पत्रावर सह्या केल्या.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-

दिनांक - ११.१२.२०२५.

(एस. जे. लाड)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भिवापूर.